# वसई-विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय विरार**

**मा.सर्वसाधारण सभा**

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ११ सभा सुचना क्र. १ दिनांक : २०/४/२०१३

**विषय:-** **वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दित असणाऱ्या मालमत्ता धारकांपैकी स्वातंत्र्य सेनादल कर्मचारी, सेवानिवृत्त सेनादल कर्मचारी व स्वातंत्र्य सैनिक यांना मालमत्ता करात सुट अथवा सवलत देणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ मध्ये कर बसविण्यांची तरतूद आहे. उक्त अधिनियमातील कलम १३२ अन्वये ज्या बाबींवर कर आकरता येणार नाही किंवा पूर्णपणे सूट देता येईल त्याबाबी नमूद करण्यांत आलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे आहेत.

१. मृताच्या विल्हेवाटीशी संबंधित प्रयोजनासाठी वापरण्यांत येणाऱ्या जागा व इमारती.

२. केवळ सार्वत्रिक पुजा अर्चा किंवा सार्वजनिक धर्मादाय प्रयोजनासाठी वापरणेत येत असलेल्या जागा व इमारती (वाणिज्य अथवा फायदा मिळविणेसाठी येत असलेल्या वगळून.)

वरिल तरतुदीमध्ये सेनादलातील कर्मचारी, सेनादलातील निवृत्त कर्मचारी व स्वातंत्र्य सैनिक यांना मालमत्ता करात सुट देण्यांबाबत अथवा सवलत देण्यांबाबत तरतुद नाही. तसेच याबाबत राज्य शासनाचे निदेश आढळ होत नाहीत.

वसई विरार शहर महानगरपालिकेकडे सेना दलातील कर्मचाऱ्यांनी करात सुट मिळणे बाबत वेळोवेळी बरेच अर्ज केलेले आहेत, काही अर्जदारांनी केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाचे पत्र क्रं.अे/२५५०२/पी सी/पी पी पी एस/डी/पे/ सर्व्हिसेस दिनांक २४/०७/१९७९ च्या पत्रासोबत अप्रमाणित पत्राची प्रत जोडली आहे. सदरच्या पत्रामध्ये नगरपालिका कर अधिनियम १८८१ चे कलम ३ अन्वये सेनादलातील कर्मचारी हे नगरपालिकेने/तत्कालीन जिल्हा मंडळे यांनी आकारणी करणेत आलेल्या करातून वगळण्याची तरतुद आहे व तसेच सदरच्या अधिनियमातील कलम ४ चे अन्वये सेनादलाकडून सूट देण्यात येणाऱ्या करापोटी अनुदान संबंधित नगरपालिका/जिल्हा मंडळास देण्यात यावे असे नमूद करण्यांत आलेले आहे. याबाबत मा. सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ११ दिनांक ०९/०१/२०१२ अन्वये मंजूरी घेवून (सूट देण्यांतबाबत) मार्गदर्शन होणेसाठी मा. प्रधान सचिव नगरविकास विभाग, मंत्रालय हयांच्या कडे पत्र जा.क्र.व.वि.श.म./सापवि/२१ दिनांक १४/०५/२०१२ रोजी पाठविण्यांत आले. परंतू आजतगायत स्वातंत्र सेनादल सेवेतील कर्मचारी, सेनादल, सेवानिवृत कर्मचारी व स्वातंत्र सैनिक यांना सुट देण्यांत यावी अथवा नाही या बद्दल कुठलेही मार्गदर्शन करण्यांत आलेले नाही. परंतू मिरा-भाईदर महापालिका व इतर महापालिकेत सेनादल कर्मचारी,सेवा निवृत्त, सेनादल कर्मचारी व स्वातंत्र सैनिक यांना मालमत्ता करामध्ये सुट देण्यांत आलेली आहे. निर्णयास्तव सादर.

**निर्णय :-** सदर बाबत सभागृहांत सविस्तर चर्चा करणेंत येऊन वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील स्वातंत्र्य सैनिक, सेनादलातील सैनिक व माजी सैनिक व त्यांची पत्नी हयात असे पर्यंत मालमत्ता करात १००% सवलत देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. प्रस्ताव नमुद केल्याप्रमाणे मालमत्ता करात सुट देण्यापूर्वी माजी सैनिक किंवा त्यांची पत्नी यांना दरवर्षी १५ मार्च पूर्वी हयात असल्याचा दाखला सादर करावा लागेल. या तारखेपूर्वी हयात असल्याचा दाखला सादर केल्यानंतरच मालमत्ता करात सूट देण्यांत येईल. त्यांच्या वारसास ही सवलत लागू होणार नाही. सदर सवलत ही माजी सैनिक व त्यांची पत्नी हयात असेपर्यंत माजी सैनिकांच्या राहत असलेल्या एकाच घरासाठी लागू राहील. बिगर निवासी वापरासाठी असलेल्या मिळकतीला ही सवलत लागू होणार नाही. तसेच परवानगी प्राप्त नसलेल्या इमारतीमध्ये शास्तीसह कर आकारणी असलेल्या इमारतींमध्ये माजी सैनिकांची घर/फ्लॅट खरेदी केल्यास अशा मालमत्तांमध्ये सवलत देता येणार नाही. या शर्तीवर स्वातंत्र्य सैनिक, सेनादलातील सैनिक व माजी सैनिकांना सामान्य करातून (घरपट्टी कर) सुट देण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.

सुचकाचे नांव - उमेश नाईक
व स्वाक्षरी —

अनुमोदकाचे नाव - विनायक निकम
व स्वाक्षरी —

अनुकूल संख्या ........ प्रतिकुल संख्या ........ तटस्थ संख्या ........
ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

सत्य प्रत
(स्वाक्षरी)
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

Sd/-
(नारायण मानकर)
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

*(आवश्यक नसेल ते खोडावे)